# ४. सामाजिक व राजकीय चळवळी

लोकशाहीमध्ये चळवळींना फार महत्त्व असते. सामाजातील सर्वच व्यक्तींना राजकीय पक्षात सहभागी होऊन सार्वजनिक हिताची कामे करता येत नाही. काही लोक एखाद्याच प्रश्नावर लक्ष केंद्रित करतात व त्या प्रश्नाचा पाठपुरावा करतात. त्यासाठी लोकांना संघटित करतात. जनमत तयार करुन राजकीय पक्ष व सरकारवर दबाव आणतात. या सामूहिक कृतींना 'चळवळ' असे म्हणतात. चळवळींतून अनेक सार्वजनिक प्रश्न चर्चेत येतात. शासनाला त्या प्रश्नांची दखल घ्यावी लागते. शासनाच्या काही निर्णयांना अथवा धोरणांना विरोध करण्यासाठीही चळवळी केल्या जातात. निषेध अथवा प्रतिकार करण्याचा हक्क ( Right to protest ) हा लोकशाहीतील एक महत्त्वाचा हक्क आहे, पण तो संयमाने वापरला पाहिजे.

**चळवळ म्हणजे काय ?**

१. चळवळ ही एक सामूहिक कृती असते. त्यात अनेक लोकांचा सक्रिय सहभाग अपेक्षित असतो.
२. विशिष्ट प्रश्नाभोवती ही चळवळ एकवटलेली असते.
३. चळवळीला नेतृत्त्व असते. नेतृत्त्वामुळे चळवळ क्रियाशील राहते.
४. चळवळींच्या संघटना असतात. संघटनांशिवाय चळवळींना सातत्याने प्रश्नाचा पाठपुरावा करता येत नाही.
५. चळवळीला जनतेचा पाठिंबा आवश्यक असतो. चळवळीचा प्रश्न जनतेला आपला वाटला पाहिजे.

**भारतीय प्रमुख चळवळी**

१. **आदिवासी चळवळ :** स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटिशांनी आदिवासींच्या जंगल संपत्तीवर उदरनिर्वाह करण्याच्या हक्कावर गदा आणली. तेव्हापासून आदिवासींचा संघर्ष चालू आहे. त्यांचे वनावरील अधिकार मान्य करावेत, वनातील उत्पादने गोळा करण्याचा अधिकार त्यांना मिळावा.

२. **भारतातील शेतकरी चळवळ -** ब्रिटिशांच्या राजवटीत शेती विरोधी धोरणामुळे शेतकरी संघटित होऊ लागले. शेती विधायक काही सुधारणांमुळे कुळ कायदा कसेल त्याची जमीन इ. ही चळवळ संथ राहिली. हरितक्रांतीनंतर शेतकरी चळवळ अधिक क्रियाशील झाली. या हरितक्रांतीचा फायदा शेतकऱ्यांना झाला नाही. त्यामुळे त्यांच्या आंदोलनाला सुरुवात झाली.

शेतमालाला योग्य भाव मिळावा. आयोगाच्या शिफारशी स्वीकारण्यात, कर्जमुक्ती इ. शेतकरी संघटनेच्या प्रमुख मागण्या आहेत.

शेतकरी संघटना, भारतीय किसान युनियन, शेतकऱ्यांच्या संघटना आहेत.

३. **कामगार चळवळ-** १८९९ मध्ये रेल्वे कामगारांनी आपल्या मागण्यांसाठी संप केला.

१९२० मध्ये कामगारांचे प्रश्न सोडविण्यासाठी व्यापक संघटना स्थापन झाली. ती म्हणजे ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेस.

स्वातंत्र्यानंतर कामगार चळवळ अधिक प्रभावी झाली. १९८० पासून जागतिकीकरणाचा परिणाम कामगार चळवळीवर झाला.

कामगार कायद्याचे संरक्षण नसणे, आरोग्य, अमर्यादित कामाचे तास इत्यादी. आजच्या कामगार चळवळी पुढील समस्या आहे.

४. **स्त्री चळवळ: -** स्त्रियांवर होणारा अन्याय, त्यांचे होणारे शोषण थांबून त्यांना सन्मानाने जगता यावे, त्यांना सार्वजनिक जीवनात सहभागी होता यावे. सुधारणा चळवळी व सती प्रथा विरोध, विधवा पुनर्विवाह, स्त्री शिक्षण, स्त्रियांना मतदानाचा अधिकार, बालविवाहाला विरोध इत्यादी. सुधारणा या चळवळीमुळे झाल्या. स्त्री स्वातंत्र्य हे उद्दिष्ट होते. स्त्री शिक्षण, त्यांना माणूस म्हणून दर्जा मिळावा हा आग्रह आहे. हे स्त्री चळवळी समोरील आजचे आव्हान आहे.

**५. पर्यावरण चळवळ: -** राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर पर्यावरण ऱ्हास ही खूप गंभीर समस्या आहे. पर्यावरण ऱ्हास रोखण्यासाठी अनेक चळवळी सक्रिय आहेत.

**६. ग्राहक चळवळ** : १९८६ साली ग्राहक संरक्षण कायदा अस्तित्वात आला. त्यानंतर ग्राहक चळवळीचा उदय झाला. अर्थव्यवस्थेतील बदलांमुळे तसेच समाजव्यवस्था बदलल्यामुळे ग्राहकांवर परिणाम होतो. भेसळ, वजन मापातील फसवणूक, वस्तूची वाढवलेली किंमत यामुळे ग्राहक जेरीस येतात म्हणून ग्राहकांचे संरक्षण करण्यासाठी ग्राहक चळवळ अस्तित्वात आली. १९८० नंतरच्या चळवळींना 'नवसमाजिक चळवळ' म्हटले जाते. कारण एकेका विषयाभोवती जनआंदोलन उभे राहू लागले आहे.